**प्रकल्प प्रवर्तक मे. पॅलाडिन पेंट्स आणि केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, भूखंड क्रं.९५/१ ते ९५/७ (पूर्वी ४३), गाव-कुंभिवली, सावरोली-खारपाडा रस्ता, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०२), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सिंथेटिक रेझिन्सचे उत्पादन विस्तारिकरण ५.० मे.टन प्रतिमासवरुन १००० मे.टन प्रतिमासपर्यंत (९९५ मे.टन प्रतिमास वाढ ) करणे, पेंट्स आणि संबंधित उत्पादनाच्या निर्मिती विस्तारिकरण ५२ मे. टन प्रतिमासावरुन १४५६ मे. टन (१४०४ मे.टन प्रतिमासवाढ) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

प्रकल्प प्रवर्तक मे. पॅलाडिन पेंट्स आणि केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, भूखंड क्रं.९५/१ ते ९५/७ (पूर्वी ४३), गाव-कुंभिवली, सावरोली-खारपाडा रस्ता, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०२), महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सिंथेटिक रेझिन्सचे उत्पादन विस्तारिकरण ५.० मे.टन प्रतिमासवरुन १००० मे.टन प्रतिमासपर्यंत (९९५ मे.टन प्रतिमास वाढ) करणे, पेंट्स आणि संबंधित उत्पादनाच्या निर्मिती विस्तारिकरण ५२ मे. टन प्रतिमासावरुन १४५६ मे. टन (१४०४ मे.टन प्रतिमासवाढ) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता सेमिनार हॉल, विश्वनिकेतन कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सर्व्हे नं.५२,५४,५५ ते ५७, कुंभिवली गाव, सावरोली खारपाडा रस्ता, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०२), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई – ४०० ६१४ तथा सदस्य, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीच्या सुरवातीस जनसुनावणी काही अपरिहार्य कारणांमुळे उशिरा सुरु झाल्याबद्दल उपस्थितांची दिलगिरी व्यक्त केली आणि त्यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व आजतायागायत सुधारीत अधिसूचनानूसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. पॅलाडिन पेंट्स आणि केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड,जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांचा त्यांच्या भूखंड क्रं.९५/१ ते ९५/७ (पूर्वी ४३), गाव-कुंभिवली, सावरोली-खारपाडा रस्ता, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०२), महाराष्ट्र राज्य येथील त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सिंथेटिक रेझिन्सचे उत्पादन विस्तारिकरण ५.० मे.टन प्रतिमासवरुन प्रतिमासवरुन १००० मे.टन प्रतिमासपर्यत (९९५ मे.टन प्रतिमास वाढ) करणे, पेंट्स आणि संबंधित उत्पादनाच्या निर्मिती विस्तारिकरण ५२ मे. टन प्रतिमासावरुन १४५६ मे. टन (१४०४ मे.टन प्रतिमासवाढ) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक ०९.०९.२०२४ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ए – ५ (एफ) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास तज्ज्ञ मुल्यमापन समिती (उद्योग-३), पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार

करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १९-०६-२०२४ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी क्रमांक IA-J-11011/276/2024-IA-II (I), दिनांक २४-०६-२०२४ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशानुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण केले. प्रकल्पाच्या विस्तारामुळे पर्यावरणावरील प्रस्तावित परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक १२.०९.२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड-१, रायगड भवन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांनी पत्र दिनांक २२.११.२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी त्यांच्या पत्र दिनांक २०.१२.२०२४ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी ०४. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-११/ २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी—२५०१०९-एफटीएस-००२९, दिनांक ०९-०१-२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,रायगड, अलिबाग, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी - रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,६वा मजला,सेक्टर-११,सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत आणि दैनिक कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २५-१२-२०२४ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,
५) प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय,खालापूर, तालुका-खालापूर,जिल्हा – रायगड,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय,खालापूर तालुका- खालापूर, जिल्हा- रायगड,

७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड,

८) नगर पंचायत कार्यालय, खालापूर, जिल्हा-रायगड,

९) ग्रामपंचायत कार्यालये- ग्रुप ग्रामपंचायत-कुंभिवली, सावरोली, माडप, कलोते, माजगाव, सांगाडे

१०) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

११) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१२) प्रादेशिक अधिकारी - रायगड,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई – ४०० ६१४,

१३) उप प्रादेशिक अधिकारी – रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर,नवी मुंबई – ४०० ६१४

१४) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड-१, यांना एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या नाहीत.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

सदस्य, आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल व त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प विस्तारिकरण वाढती मागणी लक्षात घेऊनच करण्यात येत आहे. प्रकल्पाचे प्रस्तावित विस्तारिकरण हे कार्यरत प्रकल्पातील क्षेत्रातच करण्यात येणार आहे. त्यामुळे अतिरिक्त जमिन घेण्याचा व त्यामुळे लोक विस्थापित होण्याचा प्रश्नच येत नाही.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या प्रकल्पाचे एकूण भूखंड क्षेत्र हे ४५,१०५.३९४ स्केअर मीटर असून प्रकल्पात हरित पट्टा १५,२७४.४१ स्केअर मीटर (३३.३८%) एवढा विकसित करण्यात येईल. प्रस्तावित प्रकल्पासाठीचा खर्च कार्यरत आणि विस्तारिकरण धरून एकूण १७.० कोटी रुपये अपेक्षित आहे. तसेच विस्तारिकरणामुळे बांधकाम टप्प्यात १०, नंतर कार्यरत प्रकल्पात १४ व्यक्तींना रोजगाराची संधि मिळणार असून त्यात स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. सदरहू विस्तारिकरणामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात वाढ होईल.

प्रस्तावित प्रकल्प हा झेएलडी - झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्पातील सांडपाणी प्रकल्पाबाहेर सोडले जाणार नाही.

प्रकल्पाचे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी अंदाजपत्रक सुमारे ₹ ४.० लाख असून प्रकल्प बाधीत गावातच ते खर्च करण्यात येईल. तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापनसाठी प्रस्तावित भांडवली खर्च ₹ १३०.० लाख असून आवर्ती खर्च ₹ ३७.५ लाख एवढा असेल.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे, मात्र प्रकल्पात त्यापेक्षा जास्त म्हणजे ३३.३८% हरितपट्टा क्षेत्र

विकसित करण्यात येईल. प्रकल्पात सध्या १२१ मोठी झाडे लावलेली असून विस्तारीकरणात एकूण ५०६३ नविन झाडे लावण्यात येऊन त्याचे संवर्धन करण्यात येईल.

सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री विशाल म्हामुणकर, राहणार-कुंभिवली गाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पामुळे प्रकल्प परिसरात राहणा-या लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होऊ शकतो का?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पामुळे हवा प्रदूषण न होण्यासाठी हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तक यांनी हवा प्रदूषण होई नये म्हणून हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी ₹ २० लाख तसेच एकूण पर्यावरण व्यवस्थापन खर्च रु. १.३० कोटी (₹ एक कोटी तीस लाख) एवढी तरतुद प्रस्तावित केलेली आहे. त्यामुळे कुठलेही हवा प्रदूषण होणार नाही,ज्यामुळे परिसरातील लोकांच्या आरोग्यावर परिणाम होईल.

**२) सौ. नागी गोविंद वीर, ठाकूरवाडी गाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानिकांना किती रोजगाराची संधि प्राप्त होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू कार्यरत प्रकल्पात ९६ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला असून त्यात बहुसंख्य लोक हे स्थानिकच आहेत. विस्तारिकरण प्रकल्पात बांधकाम टप्प्यात सुमारे कमीतकमी १४ व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार मिळेल, तर प्रकल्प पुर्ण/कार्यान्वित झाल्यानंतर जवळजवळ २५ व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगारी संधि प्राप्त होईल.

मात्र, सदरहू विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानिक परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात (indirect business) /रोजगारात वाढ होईल उदा.- चहाची टपरी/दुकाने, मोबाईल दुरुस्ती/विक्रीची दुकाने, दुचाकी दुरुस्ती दुकाने इ.

**३) सौ. देवकी वाघ, राहणार-कुंभिवली गाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड:-**

प्रकल्प विस्तारीकरण झाल्यानंतर प्रकल्पात किती झाडे लावण्यात येतील?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की सादरीकरणात दर्शविल्यानुसार सध्या कार्यरत प्रकल्पात १२१ मोठी झाडे लावलेली आहेत. त्याचप्रमाणे प्रकल्पात सुमारे ५०६३ नविन झाडे लावण्यात येणार आहेत. त्याशिवाय कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीतून परिसरातील रस्त्याच्या कडेला वेळोवेळी झाडे लावण्यात येतील.

**४) श्री अक्कालय्या, पर्यावरणवादी, तेलंगणा राज्य:-**

प्रकल्प विस्तारिकरण नियोजनाबद्दल प्रकल्प व्यवस्थापनाचे मी अभिनंदन करतो. प्रकल्पात व प्रकल्पाबाहेर हरितपट्टा विकसित करण्यात यावा. स्थानिक लोकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी प्रकल्पातील गावात एक वाचनालय सुरु करण्यात यावे. तसेच दर सहा महिन्यांनी स्थानिकांसाठी आरोग्यशिबिर आयोजित करण्यात यावे. तसेच प्रकल्पाच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीतून स्थानिक गावांमध्ये विकासाची कामे हाती घेण्यात यावीत. मी प्रकल्प विस्तारिकरणास पुर्ण पाठिंबा देत आहे. मी पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना विनंती करतो की त्यांनी या प्रकल्पास पर्यावरणीय अनुमती (Environment Clearance) प्रदान करावी.

पर्यावरण सल्लागार यांनी श्री अक्कालय्या, पर्यावरणवादी यांनी केलेल्या विविध सूचनांबद्दल त्यांना धन्यवाद दिले. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पाच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीतून प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावांमध्ये जेवढी मदत करता येते, तेवढी करण्यात येत आहे. आपण केलेल्या सूचनांचा प्रकल्प प्रवर्तक निश्चितच विचार करेल आणि भविष्यात त्यानुसार नियोजन करण्यात येईल.

**५) श्री अशोक राजाराम बारस्कर, राहणार-खरसुंडी गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:-**

सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक परिसरास फायदा होईल हे निश्चितच आहे. मात्र सदरहु विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवर भरती घेणे हे महत्वाचे आहे. स्थानिक पातळीवर ज्या व्यक्तींना रोजगाराची गरज आहे, त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधी देणे गरजेचे आहे. या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधि द्यावी ही मागणी योग्य आहे. मात्र प्रकल्पात काम करताना जी शैक्षणिक अहर्ता आणि अनुभव आवश्यक आहे, तो असेल तर स्थानिकांना निश्चितच प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात येते.

येथे श्री अशोक राजाराम बारस्कर यांनी मत मांडले की स्थानिक पातळीवर बरेच तरुण-तरुणी हे आवश्यक असणारी शैक्षणिक अहर्ता असणारी आहेत, आय.टी.आय उत्तीर्ण झालेले बरेच तरुण-तरुणी आहेत. त्यांना संधी देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी विस्तारिकरण प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

**६) डॉ. डी.आर. पाटील, प्राचार्य, विश्वनिकेतन कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,कुंभवली गाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

मी गेले १५ वर्षे या कॉलेजचा प्राचार्य आहे. आमच्या कॉलेजच्या ब-याच मुलांना इंटर्नशिप आणि रोजगार या कंपनीत मिळालेले आहेत. ते तेथे चांगले काम करत आहेत. हा पॅलेडिन प्रकल्प पुर्वीपासून आमचे सहकारी आहे. हे अभियांत्रिकी कॉलेज आहे. प्रकल्प व्यवस्थापन येथील सांस्कृत्तिक कार्यक्रमासाठी नेहमीच सहकार्य करतात. तरी सीएसआर निधीतून कॉलेज विविध उपक्रमासाठी सहकार्याची अपेक्षा ठेवत आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भविष्यात विविध उपक्रमांना सहकार्य वेळोवेळी करावे हीच अपेक्षा.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी आताप्रमाणेच भविष्यातही सीएसआर निधीतून सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**७) श्री निवृत्ती मोतीराम साळेकर, गांव-खरसुंडी,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

ग्रुप ग्रामपंचायतमध्ये तीन गावे येतात. खरसुंडी,कुंभवली, धामणी अशी येतात. गेले १९८५ सालापासून ही पॅलेडिन कंपनी येथे कार्यरत आहे. प्रकल्प व्यवस्थापनाने प्रकल्प विस्तारिकरणाचे नियोजन केलेले आहे. तर जे काही पर्यावरणीय निकष असतील, ते पाळून उद्योग वाढले पाहिजेत. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराची संधि मिळू शकते. तरी प्रकल्प व्यवस्थापनाने सर्व पर्यावरणीय निकषांचे तंतोतंत पालन करुन उद्योग वाढवावा. प्रकल्पास शुभेच्छा.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प पर्यावरण संवर्धानास प्रकल्प बांधिल असल्याचे सांगून केलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आश्वासन दिले.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोम करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी वेळेनंतर सुरु झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा समावेश बैठकीच्या इतिवृतात करण्यात येईल. तसेच बैठकीत प्राप्त झालेल्या लेखी सूचना,आक्षेप, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेल्या सूचना, आक्षेप, सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन

अहवाल, बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजी हा सर्व दस्तावेज अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मंजूरीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येतो. तेथील तज्ज्ञ समिती या प्रकल्पाबाबत योग्य तो निर्णय घेते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

**(प्रशांत भोसले)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सीबीडी बेलापुर,नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, रायगड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सीबीडी बेलापुर,नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड